# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 14 November 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १४ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- जलयुक्त शिवार योजनेमुळे मराठवाड्यातलं जलसंकट दूर झाल्याचं भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं छत्रपती संभाजीनगर इथल्या सभेत प्रतिपादन
- महाविकास आघाडीचं सरकार आल्यास महिला आणि शेतकरी हिताला प्राधान्य दिलं जाईल – काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं आश्वासन
- कळमनुरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार संतोष बांगर यांच्याविरुद्ध आचारसंहिता भंगाचा दुसरा गुन्हा दाखल

आणि

- मराठवाड्यात अनेक ठिकाणी मतदार जनजागृतीसाठी रॅलीसह विविध उपक्रम

****

जलयुक्त शिवार योजनेमुळे मराठवाड्यातलं जलसंकट दूर झाल्याचं भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातल्या महायुतीच्या उमेदवारांसाठी चिकलठाणा इथं झालेल्या जाहीर सभेत ते आज बोलत होते. अनेक वर्षांपासून या भागात असलेला दुष्काळ दूर करण्यासाठी महायुती सरकारने ठोस उपाययोजना करण्यास सुरुवात केल्याचं मोदी यांनी सांगितलं. ते म्हणाले –

> ***मराठवाडा में लंबे समय से पाणी का संकट रहा है। लेकिन काँग्रेस और आघाडीवाले हमेशा हाथ पर हाथ धरे बैठे रहे। हमारी सरकार ने पहली बार सुखे के खिलाफ ठोस प्रयास शुरू किये। महायुती की सरकारने वैतारणा और उल्हास सबबेसिन से पानी मराठवाडा तक पहुंचाने का फैसला लिया है।***

महायुतीचं सरकार पुन्हा आल्यास पुढील पाच वर्षात महाराष्ट्र विकासाची नवी क्षितीजं पादाक्रांत करेल, असं सांगून मोदी यांनी महायुती सरकार राबवत असलेल्या विविध योजनांचा यावेळी उल्लेख केला. आम्ही आरक्षण विरोधी आहोत असा अपप्रचार विरोधी पक्षांकडून केला जात आहे, मात्र काँग्रेस पक्षाची भूमिका कायम आरक्षण विरोधी राहिली असल्याचा आरोप त्यांनी केला.

शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले, यांच्यासह महायुतीचे इतर नेते आणि उमेदवार यावेळी उपस्थित होते.

यानंतर मोदी यांची नवी मुंबईत पनवेल इथं सभा झाली असून, मुंबईत शिवाजी पार्क इथं देखील जाहीर सभेला ते संबोधित करणार आहेत.

****

भाजप नेते केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज धाराशिव जिल्ह्यात नळदुर्ग इथं तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. ही विधानसभा निवडणूक जनतेच्या भवितव्याचा निर्णय करणारी निवडणूक असल्याचं ते यावेळी म्हणाले. महायुतीच्या दहा वर्षात धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी सहा हजार कोटी रुपये निधी दिला, तुळजापूर तीर्थक्षेत्र म्हणून विकसित होत आहे, असं त्यांनी सांगितलं.

****

काँग्रेस नेते, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज नांदेड आणि नंदुरबार इथं प्रचारसभेला संबोधित केलं. महाविकास आघाडीचं सरकार आल्यास महिला आणि शेतकरी हिताला प्राधान्य दिलं जाईल, असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं.

***जब आप धान, सोयाबिन, कपास बेचोगे तो आपको सही दाम मिनिमम सपोर्ट प्राईस काँग्रेस पार्टी की इंडिया गठबंधन की सरकार देगी।***

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी तिरोडा-गोरेगाव विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार रविकांत बोपचे यांच्या प्रचारासाठी मुढीकोठा इथं सभा घेतली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची आज छत्रपती संभाजीनगर इथं थोड्या वेळात सभा होणार आहे. तत्पूर्वी ठाकरे यांनी आज

अहिल्यानगर जिल्ह्यात श्रीगोंदा आणि नेवासे इथं जाहीर सभा घेतल्या. पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी आज दापोली इथं सभा घेतली.

****

रिपब्लिकन एकता आघाडीने विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला पाठिंबा जाहीर केला आहे. मुंबई मराठी पत्रकार संघाने आयोजित केलेल्या, उत्सव लोकशाहीचा वार्तालाप कार्यक्रमात आघाडीचे निमंत्रक आणि नेते अर्जुन डांगळे यांनी आज ही माहिती दिली.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार संतोष बांगर यांच्याविरुद्ध आचारसंहिता भंगाचा दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कळमनुरी विधानसभा मतदारसंघातल्या वाकोडी गावाशेजारी एका माळरानावर २००० महिलांना जमवून मतदानासाठी पैसे वाटप करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. माजी खासदार तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे कार्यकर्ते शिवाजी माने यांच्या फिर्यादीवरून काल रात्री उशिरा हा गुन्हा दाखल करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

येत्या २० तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन अभिनेते समीर चौगुले यांनी केलं आहे.

**बाईट – अभिनेते समीर चौगुले**

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज सोलापूर जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

मराठवाड्यात आज अनेक ठिकाणी मतदार जनजागृतीसाठी रॅलीसह विविध उपक्रम राबवण्यात आले.

छत्रपती संभाजीनगरच्या औरंगाबाद पश्चिम मतदारसंघात आयोजित मॅरेथॉन रॅलीमध्ये जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी सहभागी झाले होते. यावेळी ‘मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो’, ‘माझे मत माझा

अभिमान', 'आपले अमूल्य मत–करेल लोकशाही मजबूत' अशा घोषणा देण्यात आल्या. या रॅलीत शहरातली महाविद्यालयं तसंच अभियांत्रिकी महाविद्यालयातले विद्यार्थी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

****

धाराशिव जिल्ह्यात मतदानाचा टक्का वाढावा यासाठी प्रशासनाच्या वतीनं आज सकाळी वॉक फॉर व्होटचं आयोजन केलं होतं. धाराशिव शहरातल्या सर्व शाळांमधल्या विद्यार्थ्यांनी यात मोठ्या संख्येनं सहभाग घेतला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांच्या हस्ते या वॉकला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. यावेळी धाराशिव जिल्ह्याचे पारंपारिक वाद्य असलेली आई तुळजाभवानीच्या संबळाच्या कडकडाटात आणि ढोलच्या निनादात वॉक फॉर वोटला सुरुवात झाली.

दरम्यान, तुळजापूर इथं आज स्वीप अंतर्गत श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालय, कुलस्वामिनी माध्यमिक विद्यालय आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी मानवी साखळी करून मतदान जनजागृती केली. यावेळी मनोरंजनातून प्रबोधन करत प्रत्येक मतदारानं आपला हक्क बजावावा, असं आवाहन करत, उदयसिंह पाटील यांचा बोलक्या बाहुल्याचा कार्यक्रम झाला.

****

हिंगोली जिल्ह्यात मतदान जनजागृतीसाठी आज दुचाकी रॅली काढण्यात आली. जिल्ह्यातलं मतदानाचं प्रमाण ७५ टक्क्यांपेक्षा पुढं नेण्याचं आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी केलं. शिक्षणाधिकारी तथा `स्वीप` समितीचे नोडल प्रशांत दिग्रसकर यांची यावेळी उपस्थिती होती.

****

परभणी शहरातही आज शनिवार बाजार ते राजगोपालाचारी उद्यान रन फॉर वोट ही दौड काढण्यात आली. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्यासह पोलीस तसंच निवडणूक अधिकाऱ्यांनी या दौडला हिरवा झेंडा दाखवला. तत्पूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वांना मतदानाची शपथ दिली.

****

जालन्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी आज भोकरदन विधानसभा मतदारसंघात मतमोजणी केंद्र आणि मतदान केंद्राना भेट देवून पाहणी केली. यावेळी

पांचाळ यांनी भोकरदन नगर परिषदेच्या मंगल कार्यालयातल्या मतमोजणी केंद्राना प्रत्यक्ष भेट देवून मतदान यंत्रं सज्ज करण्याच्या प्रक्रियेदरम्यान उमेदवारांच्या नावांची तपासणी करुन एका मशीनवर 'मॉकपोल' करून व्हीव्हीपॅटद्वारे दिसणाऱ्या चिठ्ठीचीही खात्री करुन घेतली. तसंच त्यांनी स्ट्रॉन्ग रुमला भेट देवून पाहणी केली.

****

येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान करता यावं यासाठी भर पगारी सुटी देण्यात यावी, असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे कामगार उपआयुक्त चंद्रकांत राऊत यांनी संबंधितांना केलं आहे. उद्योग विभागाअंतर्गत येणारे उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या आणि संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापनांना ही सुटी लागू राहिल. मतदानासाठी सुटी मिळण्यासंदर्भात उद्भवणाऱ्या तक्रारींचं निराकरण करण्यासाठी कामगार उपआयुक्त यांच्या कार्यालयात तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला असून, संबंधित कामगार, संघटना यांनी या ठिकाणी संपर्क साधावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

****

नाशिक जिल्ह्यातले माजी खासदार हरिश्चंद्र देवराम चव्हाण यांचं आज सकाळी नाशिक इथं निधन झालं, ते ७३ वर्षांचे होते. पेठ-सुरगाणा या आदिवासी मतदारसंघातून ते सुरुवातीला अपक्ष आमदार म्हणून निवडून आले होते, त्यानंतर कॉंग्रेस पक्षाकडून एकदा खासदार तर भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर सलग दोन वेळा खासदार म्हणून निवडून आले होते. त्यांच्या पार्थिवावर आज अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

पैठणच्या जायकवाडी धरणातून गेल्या २४ सप्टेंबर पासून सुरू असलेला पाण्याचा विसर्ग आज पूर्णपणे थांबवण्यात आला. यंदाच्या पावसाळ्यात धरणात सुमारे तीन हजार १४५ दशलक्ष घनमीटर पाण्याची आवक झाली, तर धरणातून प्रथम ९ ते १३ सप्टेंबर आणि त्यानंतर २४ सप्टेंबर ते १४ नोव्हेंबर या काळात सुमारे ८६३ दशलक्ष घनमीटर पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याचं पैठण धरण नियंत्रण कक्षानं कळवलं आहे.

****